1) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्षेत्रातील रहीवाशांना मार्केटची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी आरक्षणाच्या ताब्यातील व विकसित न झालेल्या जागा, मोकळ्या जागा यावर तात्पुरत्या स्वरूपात मा. आयुक्त यांनी जागा निश्चित करून मार्केट बांधण्यात यावेत. सदर मार्केटच्या जागा ह्या सर्व प्रभागात निश्चित करून खाजगी विकासकाकडून बांधून न घेता महानगरपालिकेमार्फत बांधण्यात यावेत. सदर मार्केटमध्ये शेड, कॉंक्रीट कोबा, शौचालय, पाणी इ. व्यवस्था करण्यात यावी.

2) सदर मार्केट मध्ये बसवावयाचे विक्रेते हे त्या प्रभागातील असावे व त्याच्याकडे 10 वर्षापासून विक्रेते असल्याचा पुरावा असावा. पात्र होणाऱ्य लाभार्थ्यांनी खोटी माहिती दिल्यास रू.50,000/- दंड वसुल करावा व दंड न भरल्यास सदर वसुली मालमत्ता करातून करावे.सदर लाभार्थ्यांचा दुसरा व्यवसाय नसावा. नोकरी नसावी अथवा वाणिज्य गाळा नसावा.

3) सदर विक्रेत्यांची यादी मार्केट मधील जागे पेक्षा जास्त झाल्यास लॉटरी सिस्टीम ने जागा वितरीत कराव्या.

4) सदर विक्रेत्यांकडून रु.100/- प्रति दिन फी घेण्यात यावी. तसेच रू.1000/- लायसन्स फी घ्यावी.

5) शौचालय पे ॲन्ड यूज तत्वावर 15 वर्ष मुदतीसाठी बांधण्यास परवानगी देण्यात येईल. सदर संस्थांनी शौचालयाची देखभाल व दुरूस्ती व्यवस्थित न केल्यास 8 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करून शौचालय ताब्यात घेऊन महापालिकेमार्फत कर्मचारी अथवा संस्थेची नेमणूक करून देखभाल व दुरूस्ती करावी.

6) सदर मार्केटची साफसफाई, सुरक्षा व्यवस्था, पाणी व्यवस्था, संचलन करणाऱ्या कंत्राटदाराने करावी. वीज बिल महानगरपालिकेने अदा करावे.

7) सदर मार्केटच्या जागा व मार्केट बांधण्याचे काम बांधकाम विभागाने करावे व मार्केट मध्ये बसविण्यात येणारे विक्रेते यांची निश्चिती संबधित प्रभाग अधिकारी यांनी करावी.

8) सदर मार्केट संचलन व देखभालीसाठी आवश्यकता वाटल्यास खाजगी कंत्राटदार यांना देण्यात यावे.

9) सर्व प्रथम ज्या ठिकाणी अडथळा आहे त्या रस्त्यावरील फेरीवाले हटवून स्थलांतरीत करावे. तद्नंतर सदर रस्त्यावर पुन्हा फेरीवाले बसणार नाही याची दक्षता घ्यावी.

शुटींग धोरण

1) शुटींग करीता परवानगीसाठी संबधितांनी शुटींगच्या दिवसापूर्वी 5 दिवस आधी अर्ज करून फी व अनामत रक्कम भरून परवानगी घेणे बंधनकारक राहील, संबधित विभाग प्रमुख यांनी याबाबत दक्षता घ्यावी.

2) शुटींगसाठी परवानगी दिलेल्या क्षेत्रातील एजन्सी धारक यांना परवानगीची एक प्रत देण्यात यावी. विनापरवानगी शुटींग सुरू असल्याचे आढळल्यास संबधित मुकादम यांनी तात्काळ सदर घटनाप्रभाग मिळकत व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणावी.

3) विनापरवानगी शुटींग करताना आढळल्यास संबधिताकडून परवानगी फी 10 पट दंड वसूली करून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

स्मशानभूमी/ दफनभूमी, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पिच / फुटपाथ

1) स्मशानभूमी, दफनभूमी संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना 3 वर्ष मुदतीसाठी निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.

2) विरंगुळा केंद्र संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना मा. महासभा दि.20/03/2013 ठराव क्र. 67 अन्वये निश्चित केलेल्या धोरणानूसार निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल. तसेच अर्ज आल्यास देखील करारनामा करून संचलनास देण्यात यावा.

3) क्रिकेट पीच फुटबॉल पीच, स्केटींग जागा दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया करुन संस्थेची निवड करण्यात यावी व तीन वर्ष मुदतीसाठी जागा भाडयाने देण्यात यावी.

4) शहरातील महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, गटाराचा स्लॅब, पदपथावर व्यापारी/ दुकानदार/ गॅरेजवाले/ इतर हे विविध ठिकाणच्या जागा अनेक दिवसापासून वापरत आहेत. त्यांची व्यापारी तत्वासाठी जागेचा उपयोग केला असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे कडून अनधिकृत वापरासाठी जागा भाडे वसूल करावे.

वरील निर्णयाची नियमानुसार संबंधित विभागाने अंमलबजावणी करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मिळकत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१

// माहिती व तंत्रज्ञान विभाग //

सभा दि. १९/१२/2022

(गोषवारा)

१६१

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांसाठी 5 वर्ष कालावधीकरिता Hp कंपनीचे नविन लेझर प्रिंटर, Epson कंपनीचे कलर प्रिंटर, व झेरॉक्स मशीन विनामूल्य पुरवठा करणे, प्रिंटरच्या देखभाल दुरुस्तीसाठी रेसिडेन्स इंजिनिअर पुरवठा करणे, Toner and Cartridge पुरवठा करणे व प्रिंटरची देखभाल Comprehensive स्पेअर पार्ट सह विनामुल्य करणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागात कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटर व टोनरची आवश्यकता लागते. मनपाच्या विविध विभागातून प्रिंटर व टोनरची दैनंदिन मागणी प्राप्त होत असते. प्रिंटर दुरुस्तीसाठी इंजिनिअर व स्पेअरपार्टची आवश्यकता असते. सदरकामी महानगरपालिकेने प्रिंटर खरेदी करुन देखभाल दुरुस्ती केल्यास प्रिंटर खरेदी, प्रिंटरचे स्पेअरपार्ट व देखभाल दुरुस्ती इंजिनिअरचे वेतन असा होणारा खर्च जास्त आहे. याऐवजी ठेकेदाराकडून टोनर खरेदी करुन ठेकेदाराकडून वापरासाठी विनामुल्य प्रिंटर पूरवठा व प्रिंटरची देखभाल दुरुस्ती विनामुल्य केल्यास महानगरपालिकेच्या खर्चात बचत होते. मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध विभागांसाठी ठेकेदाराकडून 5 वर्ष कालावधीकरिता Hp कंपनीचे नविन लेझर प्रिंटर, Epson कंपनीचे कलर प्रिंटर, व झेरॉक्स मशीन वापरासाठी विनामूल्य पुरवठा करणे, प्रिंटरच्या देखभाल दुरुस्तीसाठी रेसिडेन्स इंजिनिअर पुरवठा करणे, Toner and Cartridge (Toner Brand - Hp/Canon/Blue Square/Print Solution/Epson) पुरवठा करणे व प्रिंटरची देखभाल Comprehensive स्पेअर पार्ट सह विनामुल्य करणेकामी अंदाजे रु.2,44,46,945/- खर्च होणार आहे. सदरचा खर्च अंदाजे सन 2023-24 - रु. 45,44,062/-, सन 2024-25 - रु. 46,93,716/- सन 2025-26 - रु._48,43,369/-, सन 2026-27 - रु. 49,93,023/- व सन 2027-28 - रु. 53,72,776/- वार्षिक खर्च होणार आहे. सदरकामी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा मागविणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०८/१२/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सदरकामी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार ई- निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस सविनय सादर

(संजय शिंदे)
उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दि. १९/१२/2022

प्रकरण क्र. १६९ - मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज **दि. १९/१२/2022**

ठराव क्र. १६० - मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांसाठी 5 वर्ष कालावधीकरिता Hp कंपनीचे नविन लेझर प्रिंटर, Epson कंपनीचे कलर प्रिंटर, व झेरॉक्स मशीन विनामूल्य पुरवठा करणे, प्रिंटरच्या देखभाल दुरुस्तीसाठी रेसिडेन्स इंजिनिअर पुरवठा करणे, Toner and Cartridge पुरवठा करणे व प्रिंटरची देखभाल Comprehensive स्पेअर पार्ट सह विनामुल्य करणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागात कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटर व टोनरची आवश्यकता लागते. मनपाच्या विविध विभागातून प्रिंटर व टोनरची दैनंदिन मागणी प्राप्त होत असते. प्रिंटर दुरुस्तीसाठी इंजिनिअर व स्पेअरपार्टची आवश्यकता असते. सदरकामी महानगरपालिकेने प्रिंटर खरेदी करुन देखभाल दुरुस्ती केल्यास प्रिंटर खरेदी, प्रिंटरचे स्पेअरपार्ट व देखभाल दुरुस्ती इंजिनिअरचे वेतन असा होणारा खर्च जास्त आहे. याऐवजी ठेकेदाराकडून टोनर खरेदी करुन ठेकेदाराकडून वापरासाठी विनामुल्य प्रिंटर पूरवठा व प्रिंटरची देखभाल दुरुस्ती विनामुल्य केल्यास महानगरपालिकेच्या खर्चात बचत होते. मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध विभागांसाठी ठेकेदाराकडून 5 वर्ष कालावधीकरिता Hp कंपनीचे नविन लेझर प्रिंटर, Epson कंपनीचे कलर प्रिंटर, व झेरॉक्स मशीन वापरासाठी विनामूल्य पुरवठा करणे, प्रिंटरच्या देखभाल दुरुस्तीसाठी रेसिडेन्स इंजिनिअर पुरवठा करणे, Toner and Cartridge (Toner Brand - Hp/Canon/Blue Square/Print Solution/Epson) पुरवठा करणे व प्रिंटरची देखभाल Comprehensive स्पेअर पार्ट सह विनामुल्य करणेकामी अंदाजे रु.2,44,46,945/- खर्च होणार आहे. सदरचा खर्च अंदाजे सन 2023-24 - रु. 45,44,062/-, सन 2024-25 - रु. 46,93,716/- सन 2025-26 - रु. 48,43,369/-, सन 2026-27 - रु. 49,93,023/- व सन 2027-28 - रु. 53,72,776/- वार्षिक खर्च होणार आहे. सदरकामी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा मागविणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०८/१२/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांसाठी 5 वर्ष कालावधीकरिता Hp कंपनीचे नविन लेझर प्रिंटर, Epson कंपनीचे कलर प्रिंटर, व झेरॉक्स मशीन वापरासाठी विनामूल्य पुरवठा करणे, प्रिंटरच्या देखभाल दुरुस्तीसाठी रेसिडेन्स इंजिनिअर पुरवठा करणे, Toner and Cartridge पुरवठा करणे व प्रिंटरची देखभाल Comprehensive स्पेअर पार्ट सह विनामुल्य करणेकामी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

// बांधकाम विभाग //

// गोषवारा //

सभा दि. १९/१२/2022

प्रकरण क्रमांक. (७६२) - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पॅनलवर सल्लागार म्हणुन नेमणुक करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विविध विकास कामांच्या अंमलबजावणीसाठी नकाशे तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापनाचे काम पाहण्यासाठी वास्तुविशारद / सल्लागार यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत, सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या पॅनलवर सल्लागार नेमणेसाठी मे. आर्चिनोव्हा डीझाईन इंक यांनी दि.03/12/2022 रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. सल्लागाराच्या सेवेसाठी महानगरपालिकेने मा.स्थायी समिती सभा दि.07/12/2021 ठराव क्र.95 अन्वये दर निश्चित केले आहेत. तरी मे.आर्चिनोव्हा डीझाईन इंक यांना महानगरपालिकेच्या पॅनलवर मंजूर दराने सल्लागार म्हणुन नेमणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये मान्यतेसाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सांच्या मान्यतेने

PC-11/22-23/DK/MG-1

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक १९ डिसेंबर 2022 रोजी दु.१२.३० वाजता.

विषय क्र. ( ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

१६२ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पॅनलवर सल्लागार म्हणुन नेमणुक करणेबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विविध विकास कामांच्या अंमलबजावणीसाठी नकाशे तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापनाचे काम पाहण्यासाठी वास्तुविशारद / सल्लागार यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत, सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या पॅनलवर सल्लागार नेमणेसाठी मे. आर्चिनोव्हा डीझाईन इंक यांनी दि.03/12/2022 रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. सल्लागाराच्या सेवेसाठी महानगरपालिकेने मा.स्थायी समिती सभा दि.07/12/2021 ठराव क्र.95 अन्वये दर निश्चित केले आहेत. तरी मे.आर्चिनोव्हा डीझाईन इंक यांना महानगरपालिकेच्या पॅनलवर मंजूर दराने सल्लागार म्हणुन नेमणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये प्रशासकिय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. १६१ दिनांक १९/१२/2022

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पॅनलवर सल्लागार म्हणुन नेमणुक करणेबाबत कामास मान्यता देणे कामी प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पॅनलवर सल्लागार म्हणुन मे. आर्चिनोव्हा डीझाईन इंक यांना या ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवलकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-11/22-23/DK/MT-1

आस्थापना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

(गोषवारा)

963 सभा दि. 30/12/2022

विषय :- महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करणेबाबत.

महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करणेकरीता जाहिर सूचना मागविणेस मा. आयुक्त महोदय यांनी दि.13/10/2022 रोजी मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करणेकरीता 11 महिन्यांसाठी दि.21/11/2022 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे 05 निविदाधारक प्राप्त झालेले असून त्यांचा दरपत्रक लिफाफा उघडण्यात आलेला आहे.

अ.क्र.	निविदेतील अर्हता	शरद बेलवटे	सुभाष निपाणे	मे.एस.जी. एंटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप)	शशिकांत सरफरे	एच सी इदनानी
1.	महानगरपालिकेत लेखा/ लेखापरीक्षण विभागात वर्ग-02 च्या पदावर किमान 20 वर्षे किंवा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्गातील वर्ग-02 च्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही महानगरपालिकेत लेखा/ लेखापरीक्षण विभागात वर्ग-02 च्या पदावर किमान 10 वर्षे किंवा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्गातील वर्ग-01 च्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही महानगरपालिकेत लेखा /लेखापरीक्षण विभागात मुख्य लेखा अधिकारी/ मुख्य लेखापरिक्षक या पदावर किमान 03 वर्षे	✓	✓	✓	✗	✓

अ.क्र.	निविदेतील अर्हता	शरद बेलवटे	सुभाष निपाणे	मे.एस.जी. एंटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप)	शशिकांत सरफरे	एच सी इदनानी
	सेवा केलेली असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.					
2.	किमान वेतन दर	रु.9,99,000/-	रु.9,98,000/-	रु.9,59,000/-	रु.9,09,999/-	रु.9,75,000/

उपरोक्त 05 निवदाधारकांच्या तांत्रिक लिफाफा क्र.01 मधील अर्हतेच्या कागदपत्रांची छाननी परिशिष्ठ "अ" नुसार केलेली आहे. त्यानुसार खालील 04 निविदाधारकांनी निविदेतील अर्हतेची पुर्तता केलेली आहे.

1. श्री.शरद बेलवटे
2. श्री.सुभाष निपाणे
3. मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप)
4. श्री.एच.सी.इदनानी

उर्वरीत 01 निविदाधारक श्री.शशिकांत सरफरे यांनी निविदेतील अर्हतेची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे ते अपात्र ठरत आहेत.

श्री.सुरेश केशव घोलप यांनी निविदेतील अर्हतेची पुर्तता केलेली असून, त्यांनी रु.9,59,000/- (अक्षरी रु. नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) इतके दर सादर केलेले आहेत. श्री.सुरेश केशव घोलप यांनी सादर केलेले दर L1 आहेत. त्यामुळे त्यांना 11 महिन्याच्या कालावधीकरीता कार्यादेश देणेस तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत खर्चाच्या तपशिलाबाबतचे प्रतिवृत्त मा.प्रशासक यांचेकडे मंजूरीकरीता पाठविणेस मा.निविदा निवड समितीने दि.24/11/2022 रोजी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या 644 कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप) यांना रु.9,59,000/- (अक्षरी रु. नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) इतक्या खर्चाच्या दराने 11 महिन्यांच्या कालावधीकरीता मा.आयुक्त महोदय यांनी दि.01/12/2022 रोजी मान्यता दिल्यानुसार दि.09/12/2022 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप) यांना महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या 644 कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता 11 महिन्यांसाठी रु.9,59,000/- (अक्षरी रु. नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) खर्चाच्या प्रतिवृत्तास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सबब महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या 644 कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप) यांना रु.9,59,000/- (अक्षरी रु.नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) इतक्या 11 महिन्याच्या खर्चाच्या प्रतीवृत्तास मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दि. १९/१२/2022 रोजी दुपारी १२.३० वाजता

प्रकरण क्र. :-९६३ महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करणेबाबत.

कार्यालयीन प्रस्ताव

महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करणेकरीता जाहिर सूचना मागविणेस मा. आयुक्त महोदय यांनी दि.13/10/2022 रोजी मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करणेकरीता 11 महिन्यांसाठी दि.21/11/2022 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे 05 निविदाधारक प्राप्त झालेले असून त्यांचा दरपत्रक लिफाफा उघडण्यात आलेला आहे.

अ.क्र.	निविदेतील अर्हता	शरद बेलवटे	सुभाष निपाणे	मे.एस.जी.एटर प्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप)	शशिकांत सरफरे	एच सी इदनानी
1.	महानगरपालिकेत लेखा/ लेखापरीक्षण विभागात वर्ग-02 च्या पदावर किमान 20 वर्षे किंवा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्गातील वर्ग-02 च्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही महानगरपालिकेत लेखा/ लेखापरीक्षण विभागात वर्ग-02 च्या पदावर किमान 10 वर्षे किंवा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्गातील वर्ग-01 च्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही महानगरपालिकेत लेखा /लेखापरीक्षण विभागात मुख्य लेखा अधिकारी/	✓	✓	✓	×	✓

अ.क्र.	निविदेतील अर्हता	शरद बेलवटे	सुभाष निपाणे	मे.एस.जी.एटर प्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप)	शशिकांत सरफरे	एच सी इदनानी
	मुख्य लेखापरिक्षक या पदावर किमान 03 वर्षे सेवा केलेली असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.					
2.	किमान वेतन दर	रु.9,99,000/-	रु.9,98,000/-	रु.9,59,000/-	रु.9,09,999/-	रु.9,75,000/

उपरोक्त 05 निवदाधारकांच्या तांत्रिक लिफाफा क्र.01 मधील अर्हतेच्या कागदपत्रांची छाननी परिशिष्ठ "अ" नुसार केलेली आहे. त्यानुसार खालील 04 निविदाधारकांनी निविदेतील अर्हतेची पुर्तता केलेली आहे.

1. श्री.शरद बेलवटे
2. श्री.सुभाष निपाणे
3. मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप)
4. श्री.एच.सी.इदनानी

उर्वरीत 01 निविदाधारक श्री.शशिकांत सरफरे यांनी निविदेतील अर्हतेची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे ते अपात्र ठरत आहेत.

श्री.सुरेश केशव घोलप यांनी निविदेतील अर्हतेची पुर्तता केलेली असून, त्यांनी रु.9,59,000/- (अक्षरी रु. नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) इतके दर सादर केलेले आहेत. श्री.सुरेश केशव घोलप यांनी सादर केलेले दर L1 आहेत. त्यामुळे त्यांना 11 महिन्याच्या कालावधीकरीता कार्यादेश देणेस तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत खर्चाच्या तपशिलाबाबतचे प्रतिवृत्त मा.प्रशासक यांचेकडे मंजूरीकरीता पाठविणेस मा.निविदा निवड समितीने दि.24/11/2022 रोजी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या 644 कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप) यांना रु.9,59,000/- (अक्षरी रु. नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) इतक्या खर्चाच्या दराने 11 महिन्यांच्या कालावधीकरीता मा.आयुक्त महोदय यांनी दि.01/12/2022 रोजी मान्यता दिल्यानुसार दि.09/12/2022 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप) यांना महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या 644 कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता 11 महिन्यांसाठी रु.9,59,000/- (अक्षरी रु. नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) खर्चाच्या प्रतिवृत्तास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सध्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक: एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ

च्या (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सबब, महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या 644 कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप) यांना रु.9,59,000/- (अक्षरी रु.नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) इतक्या 11 महिन्याच्या खर्चाच्या प्रतीवृत्तास मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजुरी मिळावी, असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. 962 दिनांक 29/12/2022

महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार यांची नियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.27/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या 644 कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता मे.एस.जी.एटरप्राईजेस (प्रो.श्री.सुरेश केशव घोलप) यांना रु.9,59,000/- (अक्षरी रु.नऊ लाख एकोणसाठ हजार मात्र) इतक्या 11 महिन्याच्या खर्चाच्या प्रतीवृत्तास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१

// माहिती व तंत्रज्ञान विभाग //

सभा दि. १५/१२/2022

(गोषवारा)

१६४

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Training and Installation of Face Detection and Biomatrix attendance system (Comprehensive in AMC for 3 years) कामी निविदेचे अवलोकन करणे...

मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Training and Installation of Face Detection and Biomatrix attendance system (Comprehensive in AMC for 3 years) कामी जा.क्र.मनपा/जनसंपर्क/२६८/२०२२-२३ दि.२६/०९/२०२२ रोजी (GeM) पोर्टलदवारे (GEM/2022/B/2573053) ई-निविदा मागविण्यात आलेली आहे. M/s.Allwins Enterprises.,व M/s.OBM Automation Private Limited., यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर न केल्याने ते अपात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारक M/s.Ezone Enterprises., M/s.Core Ocean Solutions LLP.,व M/s.Mandate I.T Solutions Private Limited.,यांचा दराचा लिफाफा उघडणेस मा. आयुक्त सो. यांची दि.२४/११/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. पात्र निविदाधारक M/s.Ezone Enterprises., M/s.Core Ocean Solutions LLP.,व M/s.Mandate I.T Solutions Private Limited., यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

Sr. No	Description	Qty	M/s.Core Ocean Solutions LLP.,(L1)		M/s.Ezone Enterprises., (L2)		M/s.Mandate I.T Solutions Private Limited., (L3)	
			दर प्रति नग	एकूण	दर प्रति नग	एकूण	दर प्रति नग	एकूण
1.	Face Detection and Biomatrix attendance System with one Year Comprehensive Warranty, Installation and Support	35	24,200/-	8,47,000/-	25,600/-	8,96,000/-	27,143/-	9,50,005/-
2.	Additional 2 Years Comprehensive Warranty, Installation and Support	35	5,600/-	1,96,000/-	7,143/-	2,50,005/-	10,000/-	3,50,000/-
	TOTAL			10,43,000/-		11,46,005/-		13,00,005/-

वरील तुलनात्मक तक्ता पाहता पात्र निविदाधारक M/s.Core Ocean Solutions LLP., यांनी निविदेत सादर केलेले दर हे इतर निविदाधारक M/s.Ezone Enterprises., व M/s.Mandate I.T Solutions Private Limited., यांच्या तुलनेत कमी आहेत. निविदाधारक M/s.Core Ocean Solutions LLP., यांचे दर वाजवी असल्याने M/s.Core Ocean Solutions LLP., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मान्यता देऊन कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०८/१२/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. या कामी रु. १०,४३,०००/- वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार प्रशासकीय सभेत मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Training and Installation of Face Detection and Biomatrix attendance system (Comprehensive in AMC for 3 years) कामी मा.प्रशासक यांचेकडे अवलोकन करणेस शिफारस आहे.

(संजय शिंदे)
उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दि.१९/१२/२०२२

प्रकरण क्र. १६४ - मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज **दि. १९/१२/२०२२**

ठराव क्र. १६३ - मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Training and Installation of Face Detection and Biomatrix attendance system (Comprehensive in AMC for 3 years) कामी निविदेचे अवलोकन करणे...

मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Training and Installation of Face Detection and Biomatrix attendance system (Comprehensive in AMC for 3 years) कामी जा.क्र.मनपा/जनसंपर्क/२६८/२०२२-२३ दि.२६/०९/२०२२ रोजी (GeM) पोर्टलदवारे (GEM/2022/B/2573053) ई-निविदा मागविण्यात आलेली आहे. M/s.Allwins Enterprises.,व M/s.OBM Automation Private Limited., यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर न केल्याने ते अपात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारक M/s.Ezone Enterprises., M/s.Core Ocean Solutions LLP.,व M/s.Mandate I.T Solutions Private Limited.,यांचा दराचा लिफाफा उघडणेस मा. आयुक्त सो. यांची दि.२४/११/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. पात्र निविदाधारक M/s.Ezone Enterprises., M/s.Core Ocean Solutions LLP.,व M/s.Mandate I.T Solutions Private Limited., यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

Sr. No	Description	Qty	M/s.Core Ocean Solutions LLP.,(L1)		M/s.Ezone Enterprises., (L2)		M/s.Mandate I.T Solutions Private Limited., (L3)	
			दर प्रति नग	एकूण	दर प्रति नग	एकूण	दर प्रति नग	एकूण
1.	Face Detection and Biomatrix attendance System with one Year Comprehensive Warranty, Installation and Support	35	24,200/-	8,47,000/-	25,600/-	8,96,000/-	27,143/-	9,50,005/-
2.	Additional 2 Years Comprehensive Warranty, Installation and Support	35	5,600/-	1,96,000/-	7,143/-	2,50,005/-	10,000/-	3,50,000/-
TOTAL				10,43,000/-		11,46,005/-		13,00,005/-

वरील तुलनात्मक तक्ता पाहता पात्र निविदाधारक M/s.Core Ocean Solutions LLP., यांनी निविदेत सादर केलेले दर हे इतर निविदाधारक M/s.Ezone Enterprises., व M/s.Mandate I.T Solutions Private Limited., यांच्या तुलनेत कमी आहेत. निविदाधारक M/s.Core Ocean Solutions LLP., यांचे दर वाजवी असल्याने M/s.Core Ocean Solutions LLP., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मान्यता देऊन कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०८/१२/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. या कामी रु. १०,४३,०००/- वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार प्रशासकीय सभेत मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Training and Installation of Face Detection and Biomatrix attendance system (Comprehensive in AMC for 3 years) कामी मा. प्रशासक यांचेकडे अवलोकन करण्यात येत आहे.

(वासुदेव शिरधळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१

// माहिती व तंत्रज्ञान विभाग //

सभा दि. ३०/१२/२०२२

(गोषवारा)

१६५

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांना 100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Router, cables and all Accessories) and Wireless Airtel/Jio/ Vodafone इंटरनेट सुविधा पुरवठा करणेकामी निविदेचे अवलोकन करणे...

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांना 100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Router, cables and all Accessories) and Wireless Airtel/Jio/Vodafone इंटरनेट सुविधा पुरवठा करणेकामी MBMC/PRO/273/2022-23 https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२१/१०/२०२२ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी (2022_MBMC_846352_1) आहे. सदरकामी एकूण ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदाधारक मे. डायना इन्फोकॉम., यांनी निविदेतील अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर न केल्याने ते अपात्र ठरले आहेत.

पात्र निविदाधारक मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स., व मे. डिस कॉम्प्युटर्स., यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

Sr. No	Description	Qty	मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स.,		मे. डिस कॉम्प्युटर्स.,	
			दर प्रति नग	एकूण	दर प्रति नग	एकूण
1.	100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Routers, cables and all Accessories) (unlimited download)	50	17,999/-	8,99,950/-	18,000/-	9,00,000/-
2.	Wireless Airtel/Jio/Vodafone (Data per day 3 GB Or Monthly 90 GB)	30	12,999/-	3,89,970/-	14,000/-	4,20,000/-
	Total			12,89,920/- (अधिक GST)		13,20,000/- (अधिक GST)

वरील तुलनात्मक तक्ता पाहता पात्र निविदाधारक मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स.,यांनी निविदेत सादर केलेले दर हे इतर निविदाधारक मे. डिस कॉम्प्युटर्स.,यांच्या तुलनेत कमी आहेत. निविदाधारक मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स.,यांचे दर वाजवी असल्याने मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मान्यता देऊन कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०८/१२/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. या कामी रु. १२,८९,९२०/- (अधिक GST) वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(क) नुसार प्रशासकीय सभेत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांना 100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Router, cables and all Accessories) and Wireless Airtel/Jio/Vodafone इंटरनेट सुविधा पुरवठा करणेकामी मा.प्रशासक यांचेकडे अवलोकन करणेस शिफारस आहे.

(संजय शिंदे)
उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दि. १९/१२/२०२२

प्रकरण क्र. १६५ - मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज **दि. १९/१२/२०२२**

ठराव क्र. १६४ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांना 100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Router, cables and all Accessories) and Wireless Airtel/Jio/ Vodafone इंटरनेट सुविधा पुरवठा करणेकामी निविदेचे अवलोकन करणे...

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांना 100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Router, cables and all Accessories) and Wireless Airtel/Jio/Vodafone इंटरनेट सुविधा पुरवठा करणेकामी MBMC/PRO/273/2022-23 https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२१/१०/२०२२ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली. सदर निविदेचे टेंडर आयडी (2022_MBMC_846352_1) आहे. सदरकामी एकूण ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदाधारक मे. डायना इन्फोकॉम., यांनी निविदेतील अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर न केल्याने ते अपात्र ठरले आहेत.

पात्र निविदाधारक मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स., व मे. डिस कॉम्प्युटर्स., यांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

Sr. No	Description	Qty	मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स.,		मे. डिस कॉम्प्युटर्स.,	
			दर प्रति नग	एकूण	दर प्रति नग	एकूण
1.	100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Routers, cables and all Accessories) (unlimited download)	50	17,999/-	8,99,950/-	18,000/-	9,00,000/-
2.	Wireless Airtel/Jio/Vodafone (Data per day 3 GB Or Monthly 90 GB)	30	12,999/-	3,89,970/-	14,000/-	4,20,000/-
Total				12,89,920/- (अधिक GST)		13,20,000/- (अधिक GST)

वरील तुलनात्मक तक्ता पाहता पात्र निविदाधारक मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स.,यांनी निविदेत सादर केलेले दर हे इतर निविदाधारक मे. डिस कॉम्प्युटर्स.,यांच्या तुलनेत कमी आहेत. निविदाधारक मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स.,यांचे दर वाजवी असल्याने मे. एस. व्हे कॉम्प्युटर्स., यांनी निविदेत सादर केलेल्या दरास मान्यता देऊन कामाचा करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस मा. आयुक्त सो. यांची दि.०८/१२/२०२२ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. या कामी रु. १२,८९,९२०/- (अधिक GST) वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73(ड) नुसार प्रशासकीय मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा शाळांना 100 Mbps Broad Band Internet Plan (with Wifi Router, cables and all Accessories) and Wireless Airtel/Jio/Vodafone इंटरनेट सुविधा पुरवठा करणेकामी मा. प्रशासक यांचेकडे अवलोकन करण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

भांडार विभाग

सभा दि. 30/12/2022

// गोषवारा //

प्रकरण क्र. १६६:- मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन मनपाच्या नोटीस बोर्डवर जाहीर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र असलेले दरपत्रकधारक मे. सुजल नोव्हेल्टी यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने दरपत्रकातील दरास मा.आयुक्त सो. दि.28/10/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेकामी अंदाजित रु. 7,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. तरी रु. 7,00,000/- इतक्या झालेल्या खर्चास मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त (मध्यवर्ती भांडार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
भांडार विभाग

प्रशासकीय ठराव दि.१९/१२/2022

प्रकरण क्र. १६६:- मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणे कामाचे अवलोकन करणे.

ठराव क्र. १६५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणे कामाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या 1 (अ) व 1 (ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14, दि. 26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी" याकामी दरपत्रकधारक मे. सुजल नोव्हेल्टी यांच्यामार्फत खरेदी केलेल्या रु. 7,00,000/- च्या मर्यादेत खर्चास मान्यता देत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
// गोषवारा //

सभा दि. १९/१२ /2022

प्रकरण क्रमांक :- (१६७) निविदांना मान्यता देणे.

1. पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व किरकोळ देखभाल दुरुस्तीकरीता सी.आय व डी.आय पाईप पुरवठा करणे. (डी-फॉम) (अंदाजित रक्कम रु.1,69,48,187/- जी.एस.टी.वगळून) (Tender Id :- 840210_1) (फेर-निविदा सुचना क्र.22/01)

पाईपचा व्यास D.I. Pipes (K-7)	मे. केसरी ॲन्ड कंपनी यांनी सादर केलेले दर	दरवाटाघाटीनंतर सादर केलेले दर
100 mm dia	1395.00	1384.00
150 mm dia	1976.00	1930.00
200 mm dia	2655.00	2560.00
250 mm dia	3600.00	3327.00
300 mm dia	4248.00	4089.00
350 mm dia	5310.00	5112.00
400 mm dia	6232.00	6100.00
450 mm dia	7493.00	7266.00
500 mm dia	8991.00	8463.00
600 mm dia	11603.00	11180.00

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देणेस शिफारस आहे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

E:\1. Water\Rane\Goshwara\2022-23\Goshwara - Nivida Manjuri - Aayuta - RE -NS - 28 - C.I. & D.I.doc

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकिय ठराव क्र. १६६ **दिनांक :-** १९/१२/2022

प्रकरण क्रमांक :- (१६७ **) निविदांना मान्यता देणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध निविदांना मान्यता देण्याच्या प्रस्तावांच अवलोकन करण्यात आले

1. **पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व किरकोळ देखभाल दुरुस्तीकरीता सी.आय व डी.आय पाईप पुरवठा करणे. (डी-फॉम) (अंदाजित रक्कम रु.1,69,48,187/- जी.एस.टी.वगळून) (Tender Id :- 840210_1) (फेर-निविदा सुचना क्र.22/01)**

पाईपचा व्यास D.I. Pipes (K-7)	मे. केसरी ॲन्ड कंपनी यांनी सादर केलेले दर	दरवाटाघाटीनंतर सादर केलेले दर
100 mm dia	1395.00	1384.00
150 mm dia	1976.00	1930.00
200 mm dia	2655.00	2560.00
250 mm dia	3600.00	3327.00
300 mm dia	4248.00	4089.00
350 mm dia	5310.00	5112.00
400 mm dia	6232.00	6100.00
450 mm dia	7493.00	7266.00
500 mm dia	8991.00	8463.00
600 mm dia	11603.00	11180.00

वरील निविदांना मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देत आहे.

(दिलाप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

// प्रशासकीय गोषवारा //

सभा दि. १४/२/२०२२

प्रकरण :-१६८ मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 5 Star व ODF++ / Water Plus मानांकनाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका सन 2022 स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशात 07 व महाराष्ट्रात 01 क्रमांक मिळाला आहे. शहर कचरामुक्त (Garbage Free) म्हणून घोषित झाले असून 3 Star Rating मिळाले आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे स्वच्छ करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मिरा भाईंदर शहराला कचरामुक्त होण्याकरीता एकुणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने सुधारणा होण्यास्तव तांराकित मांनाकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (Protocol for Making Cities Garbage Free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आलेली आहे. कचरामुक्त शहरांचे तांरकित मानांकन (5 Star Rating) ठरविताना विचारात घेतली जाणारी उपांगे/ बाबी काही प्रमाणात मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्ण करीत असून काही निकष येत्या दोन ते तीन महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

मिरा भाईदर महानगरपालिका शहर कचरा मुक्त शहराच्या 01 ते 07 मानांकनापैकी 5 Star तारांकित मानांकनासाठी (Star Rating) घोषित करणेसाठी मा. आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी घेऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे आवश्यक आहे.

तसेच स्वच्छ भारत अभियानांतर्गत ODF++ / Water Plus तांराकित मांनाकन देण्याबाबतची नियमावली केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आलेली आहे. ODF++ / Water Plus तांरकित मानांकन ठरविताना विचारात घेतली जाणारी बाबींमधील काही बाबींचे निकष देखील मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्ण करीत असून काही निकष येत्या दोन ते तीन महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत ODF++ / Water Plus तांराकित मानांकन घोषित करणेसाठी मा. आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी घेऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे आवश्यक आहे.

तरी सद्यपरिस्थितीची स्वयंमुल्यांकन व स्वयपडताळणी करुन मिरा भाईंदर शहर हे 5 Star व ODF++ / Water Plus घोषित करणेबाबत प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(रवि पवार)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Water+ & 5star Prashaskiya.docx

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

प्रशासकीय ठराव दिनांक १९/१२ /2022

प्रकरण :-१९८ मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 5 Star व ODF++ / Water Plus मानांकनाबाबत.

ठराव क्र. :- १६७

मिरा भाईंदर महानगरपालिका सन 2022 स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशात 07 व महाराष्ट्रात 01 क्रमांक मिळाला आहे. शहर कचरामुक्त (Garbage Free) म्हणून घोषित झाले असून 3 Star Rating मिळाले आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे स्वच्छ करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मिरा भाईंदर शहराला कचरामुक्त होण्याकरीता एकुणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने सुधारणा होण्यास्तव तांराकित मांनाकन (Star Rating) देण्याबाबतची नियमावली (Protocol for Making Cities Garbage Free) केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आलेली आहे. कचरामुक्त शहरांचे तांरकित मानांकन (5 Star Rating) ठरविताना विचारात घेतली जाणारी उपांगे/ बाबी काही प्रमाणात मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्ण करीत असून काही निकष येत्या दोन ते तीन महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

मिरा भाईदर महानगरपालिका शहर कचरा मुक्त शहराच्या 01 ते 07 मानांकनापैकी 5 Star तारांकित मानांकनासाठी (Star Rating) घोषित करणेसाठी मा. आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी घेऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे आवश्यक आहे.

तसेच स्वच्छ भारत अभियानांतर्गत ODF++ / Water Plus तांराकित मांनाकन देण्याबाबतची नियमावली केंद्र शासनामार्फत तयार करण्यात आलेली आहे. ODF++ / Water Plus तांरकित मानांकन ठरविताना विचारात घेतली जाणारी बाबींमधील काही बाबींचे निकष देखील मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्ण करीत असून काही निकष येत्या दोन ते तीन महिन्यामध्ये पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत ODF++ / Water Plus तांराकित मानांकन घोषित करणेसाठी मा. आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी घेऊन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे आवश्यक आहे.

तरी सद्यपरिस्थितीची स्वयंमुल्यांकन व स्वयपडताळणी करुन मिरा भाईंदर शहर हे 5 Star व ODF++ / Water Plus घोषित करणेबाबत प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Water+ & 5star Prashaskiya.docx

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मालमत्ता व्यवस्थापन विभाग

// गोषवारा //

सभा दि. १४/११/२०२२

प्रकरण क्रमांक (१६९) :- आरक्षण क्र.100 मध्ये निशुल्क योग प्रशिक्षण व योगाभ्यास करण्यासाठी जागा भाड्याने देणे.

दि.17/11/2022 सुरज प्रकाश या वृत्तपत्रात व मिरा भाईंदर संकेत स्थळावर मध्ये प्रसिद्ध झालेल्या निविदेनुसार सदर कामाकरिता खालिल संस्थेने मुदतीने निविद सादर केलेला आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	मा. आयुक्त यांची प्रशासकिय/ आर्थिक मान्यता	निविदा प्रसिध्दि देणे
1	आरक्षण क्र.100 मध्ये निशुल्क योग प्रशिक्षण व योगाभ्यास करण्यासाठी जागा भाड्याणे देणे.	दि.14/11/2022	दि.17/11/2022

अ.क्र.	संस्थेचे नाव
1	नरसिम्हा चॅरिटेबल ट्रस्ट भाईंदर (प.)
2	मे. जीवन ज्योती फाऊंडेशन भाईंदर (प.)
3	मे. गोपीकिशन अग्रवाल चॅरीटेबल ट्रस भाईंदर (प.)

वरील प्रमाणे निविदा प्रास्त झालेल्या असुन अ.क्र. 1) मे.नरसिम्हा चॅरीटेबल ट्रस्ट यांनी नोंदणी प्रमाणे पत्र सादर केले नाही. अ.क्र. 2) मे जीवन ज्योती फाऊंडेशन यांनी नोंदणी प्रमाण पत्र सादर केलेले आहे. अ.क्र. 3) मे. गोपीकिशन अग्रवाल चॅरीटेबल ट्रस यांनी नोंदणी प्रमाण पत्र सादर केलेले नाही.

अ.क्र. 2 मे. जीवन ज्योती फाऊंडेशन यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. सदर संस्थेस तीन वर्ष मुदतीसाठी विनामुल्य प्रशिक्षण देऊन योगा केंद्र चालविणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

PC-1/2022-23/SM/SG-13

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक १९ डिसेंबर 2022 रोजी दु. १२-३० वाजता.

विषय क्र. ( ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

१६९ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.100 मध्ये निशुल्क योग प्रशिक्षण व योगाभ्यास करण्यासाठी जागा भाड्याणे देणे.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि.17/11/2022 सुरज प्रकाश या वृत्तपत्रात व मिरा भाईंदर संकेत स्थळावर मध्ये प्रसिद्ध झालेल्या निविदेनुसार सदर कामाकरिता खालिल संस्थेने मुदतीने निविद सादर केलेला आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	मा. आयुक्त यांची प्रशासकिय/ आर्थिक मान्यता	निविदा प्रसिध्दि देणे
1	आरक्षण क्र.100 मध्ये निशुल्क योग प्रशिक्षण व योगाभ्यास करण्यासाठी जागा भाड्याणे देणे.	दि.14/11/2022	दि.17/11/2022

अ.क्र.	संस्थेचे नाव
1	नरसिम्हा चॅरिटेबल ट्रस्ट भाईंदर (प.)
2	मे. जीवन ज्योती फाऊंडेशन भाईंदर (प.)
3	मे. गोपीकिशन अग्रवाल चॅरीटेबल ट्रस भाईंदर (प.)

वरील प्रमाणे निविदा प्रास्त झालेल्या असुन अ.क्र. 1) मे.नरसिम्हा चॅरीटेबल ट्रस्ट यांनी नोंदणी प्रमाणे पत्र सादर केले नाही. अ.क्र.2) मे जीवन ज्योती फाऊंडेशन यांनी नोंदणी प्रमाण पत्र सादर केलेले आहे. अ.क्र.3) मे. गोपीकिशन अग्रवाल चॅरीटेबल ट्रस यांनी नोंदणी प्रमाण पत्र सादर केलेले नाही.

अ.क्र. 2 मे. जी जीवन ज्योती फाऊंडेशन यांनी नोंदणी प्रमाण पत्र सादर केलेले असुन सदर संस्थेस मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. १६८ दिनांक १९/१२/2022

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.100 मध्ये निशुल्क योग प्रशिक्षण व योगाभ्यास करण्यासाठी जागा भाड्याणे देणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-

2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार मे. जीवन ज्योती फाऊंडेशन यांनी नोंदणी प्रमाण पत्र सादर केलेले आहे. सदर संस्थेस प्रस्तावित शेडमध्ये विनामुल्य योगाचे प्रशिक्षण व क्लासेस चालविणेस 1 वर्ष मुदतीसाठी नेमणेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील निर्णयाची नियमानुसार संबंधित विभागाने अंमलबजावणी करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-1/22-23/SM/SG T- 7

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मालमत्ता व्यवस्थापन विभाग

// गोषवारा //

सभा दि. ३०/१२/२०२२

प्रकरण क्रमांक (१७०) :- मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 170 आला हजरत इमाम एहमद रजा खॉ मैदानातील क्रिकेट पीच भाड्याने देण्यासाठी मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 170 आला हजरत इमाम एहमद रजा खॉ मैदानातील क्रिकेट पीच भाड्याने देणेसाठी जाहिर निविदा प्रसिध्दी करण्यात आली होती त्या अनुषंगाने खालील पात्र संस्थेचे भाडे दराचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठेकेदराचे नाव	ठेकेदराने सादर केलेले
1.	मे. मिरा-भाईंदर युवा फाऊंडेशन	रु. 14,000/- प्रति महिना
2.	मे. फिरोज सख्खद फाऊंडेशन	रु. 11,200/- प्रति महिना
3.	मे. हेल्पिंग स्टार फाऊंडेशन	रु. 27,000/- प्रति महिना
4.	मे. आयुशी इंटरप्रायझेस	रु. 16,000/- प्रति महिना
5.	मे. स्टार फाऊंडेशन	रु. 19,000/- प्रति महिना

वरील पैकी अ.क्र.03 मे. हेल्पिंग स्टार फाऊंडेशन यांचे दर जास्तीचे असल्याने त्याच्या सोबत 03 वर्ष मुदतीकरिता करारनामा करुन जागा भाडेतत्वावर देणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

PC-1/2022-23/SM/SG-14

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक १९ डिसेंबर 2022 रोजी दु. १२.३० वाजता.

विषय क्र. ( ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

१७० मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 170 आला हजरत इमाम एहमद रजा खॉ मैदानातील क्रिकेट पीच भाड्याने देण्यासाठी मान्यता देणे.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 170 आला हजरत इमाम एहमद रजा खॉ मैदानातील क्रिकेट पीच भाड्याने देणेसाठी जाहिर निविदा प्रसिध्दी करण्यात आली होती त्या अनुषंगाने खालील पात्र संस्थेचे भाडे दराचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठेकेदराचे नाव	ठेकेदराने सादर केलेले
1.	मे. मिरा-भाईंदर युवा फाऊंडेशन	रु. 14,000/- प्रति महिना
2.	मे. फिरोज सख्खद फाऊंडेशन	रु. 11,200/- प्रति महिना
3.	मे. हेल्पिंग स्टार फाऊंडेशन	रु. 27,000/- प्रति महिना
4.	मे. आयुशी इंटरप्रायझेस	रु. 16,000/- प्रति महिना
5.	मे. स्टार फाऊंडेशन	रु. 19,000/- प्रति महिना

वरील पैकी अ.क्र.03 मे. हेल्पिंग स्टार फाऊंडेशन यांचे दर जास्तीचे असल्याने त्याच्या सोबत 03 वर्ष मुदतीकरिता करारनामा करुन जागा भाडेतत्वावर देणेस प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. १६९ दिनांक १९/१२/2022

मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 170 आला हजरत इमाम एहमद रजा खॉ मैदानातील क्रिकेट पीच भाड्याने देण्यासाठी कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर

केल्यानुसार मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. 170 आला हजरत इमाम एहमद रजा खॉ मैदानातील क्रिकेट पीच तीन वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील निर्णयाची नियमानुसार संबंधित विभागाने अंमलबजावणी करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-1/22-23/SM/SG T- 8

मिरा भाईंदर महानगरपालिका

// विद्युत विभाग //

// गोषवारा //

सभा दि. १९/१२/२०२२

प्रकरण क्रमांक. (१७१)- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणच्या मालमत्तांकरीता ऊर्जा बचत करणे व इतर आवश्यक उपाययोजना अंमलात आणणेकामी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मनपामार्फत विविध पायाभूत सुविधा पुरविण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते, गटारे, उद्याने, हॉस्पीटल, पंम्पींग स्टेशन, मल:निस्सारण केंद्र, स्मशानभूमी, विविध विभागीय कार्यालय/ प्रभाग कार्यालय इत्यांदीचा समावेश आहे. सदर ठिकाणी ऊर्जा बचत करणे कामी ESCO Project, Renewable Energy projects, E-Mobility, Waste to Energy Projects, Environments Related Project, Infrastructure Project इत्यादी प्रकल्प राबविणे कामी M/s. MAHAPREIT यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर संस्थेसोबत पुणे महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका इत्यादी ठिकाणी सामंज्यस्य करार (MOU) झालेला आहे.

त्याच धर्तीवर सदर संस्थेमार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ऊर्जा बचत प्रकल्प राबविणेकामी व इतर आवश्यक उपाययोजना अंमलात आणणेकामी सामज्यंस्य करार (MOU) करणे आवश्यक आहे. वरील कामास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-6/2022-23/DK/MG-16

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक १९ डिसेंबर 2022 रोजी दु.१२.३०वाजता.

विषय क्र. ( ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

१७१ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणच्या मालमत्तांकरीता ऊर्जा बचत करणे व इतर आवश्यक उपाययोजना अंमलात आणणेकामी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मनपामार्फत विविध पायाभूत सुविधा पुरविण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते, गटारे, उद्याने, हॉस्पीटल, पंम्पींग स्टेशन, मल:निस्सारण केंद्र, स्मशानभूमी, विविध विभागीय कार्यालय/ प्रभाग कार्यालय इत्यांदीचा समावेश आहे. सदर ठिकाणी ऊर्जा बचत करणे कामी ESCO Project, Renewable Energy projects, E-Mobility, Waste to Energy Projects, Environments Related Project, Infrastructure Project इत्यादी प्रकल्प राबविणे कामी M/s. MAHAPREIT यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर संस्थेसोबत पुणे महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका इत्यादी ठिकाणी सामंज्यस्य करार (MOU) झालेला आहे.

त्याच धर्तीवर सदर संस्थेमार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ऊर्जा बचत प्रकल्प राबविणेकामी व इतर आवश्यक उपाययोजना अंमलात आणणेकामी सामंज्यस्य करार (MOU) करणे कामास प्रशासकिय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र.१७०दिनांक १९/१२/2022

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणच्या मालमत्तांकरीता ऊर्जा बचत करणे व इतर आवश्यक उपाययोजना अंमलात आणणेकामी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे कामी प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

